# माहेरचा सुगंध

प्रकाशित: अन्नपूर्णा मासिक मार्च २०११

रत्नाकर वाणी

पुनरारंभ

© पुनरारंभ

website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# माहेरचा सुगंध

वसंतराव एक साधारण शेतकरी. निला त्यांची एकुलती एक लाडकी कन्या तिला चांगले घराणे मिळावे हे त्यांचे सौभाग्यच. निळकंठ एक देखणा, हुशार, मनमिळाउ, सुस्वभावी व होतकरू तरूण त्यांना जावई मिळाला होता. उंचीने जरा ठेंगणाच परंतू अंगा पिंडाने मजबूत. व्यवसायाने उच्च शिक्षित निष्णात डॉक्टर. गावात घराजवळच मध्यवर्ती ठिकाणी गावाच्या दृष्टिने सुसज्ज असे नामांकित हॉस्पिटल. गावातच राहण्यास मोठा भव्य सुंदर वाडा. व्याही भववंतराव गावातील प्रतिष्ठित सधन शेतकरी. वीस पांचवीस एकर बागायती. पाच पंचवीस दुभती जनावरे. शेती व्यतिरिक्त दुधाचा व्यवसाय त्यामुळे घरात दुध दुभत्याची रेलचेल. शेतीची सर्व अत्याधुनिक अवजारे. एक ट्रॅक्टर व टाटा सुमोसारखी दोन चारचाकी वाहने. निलाचा एकच उच्चशिक्षित दिर. तो पण मुंबईस एका मोठया नामांकित कंपनीत मॅनेजिंग डायरेक्टर चे पदावर कार्यरत. सासुबाई पण मनमिळाउ प्रेमळ गृहलक्ष्मी.

निला वसंतरावांची वाणिज्य शाखेतून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेली एकुलती एक लाडकी. आज विवाहानंतर प्रथमच श्रावण मासाचे औचित्य साधून माहेरपणास आली होती. श्रावण मासातील आनंदी वातावरणा प्रमाणेच तिचे मन आनंदाने भरले होते. याचा प्रत्यय तिच्या प्रत्येक वागण्या बोलण्यातून स्पष्ट जाणवत होता. दिर्घ कालावधीनंतर माहेरपणास आल्यावर आई–बाबांशी किती बोलू अन् बोलू किती नको असे झाले होते. आल्या पासून ती सारखी बडबड करित होती. घरातील प्रत्येक काना कोपरा न्याहाळीत होती. एवढेच नव्हे तर गोठयात जाउन लाडक्या कपिलेशी बोलत होती तर कधी वासराशी खेळत होती. तिची ती प्रत्येक अवखळ वर्तणुक तिच्या आईच्या नजरेतून सुटुच शकत नव्हती. निला विवाहउपरांत पहिल्या पेक्षा अधिक प्रसन्न आणि चंचल वाटत होती.

संध्याकाळी परसबागेत फिरत असतांना सहजच तिची नजर कोप–यात गेली. तेथे एक मोठे फुलणारे प्राजक्ताचे झाड होते. नाजूक पांढरी लाल दांडीची फुले तिच्या आवडीची. ते झाड तिचे नजरेस न पडलेमुळे तिने बाबांना थोडया अधिकार वाणीने विचारले

“बाबा, येथे प्राजक्ताचे झाड होते. छान फुले यायची त्याला काठे गेले ते?”

“खाली कचरा पडायचा व घरात थोडाफार अंधार पण दाटायचा म्हणून काढून टाकले.” बाबांनी सहजतेने उत्तर दिले.

तिचे आवडते झाड असलेमुळे तिला वाईट वाटले व आपली नाराजी दर्शवित लाडिक स्वरात अट्टाहास करित म्हणाली " ते काही नाही परत दुसरे झाड घेऊन या ते पण प्राजक्ताचेच."

"बरं बाई, लावतो मग तर खुश. आमची लाडकी लेक ना ती तिचे ऐकायचे नाही तर कोणाचे" म्हणत बाबांनी तिचा लटका राग आवरला.

जवळच निशीकंदाच्या पांढ-या फुललेल्या सुगंधी फुलांच्या ताटव्याने तिचे मन आकर्षून घेतले व तोंडातून उदगार निघाले.

"व्वाव ! काय सुंदर फुले आहेत. सुवास पण फार छान सुटलाय नाही. आई मी हे कंद घेऊन जाईन. आमच्या वाडयात लाविन. "

" अगं लब्बाडे, आता आमचा वाडा पण झाला वाटतं "आई तिची चेष्टा करित म्हणाली.

"हे गं काय आई, तु पण माझी चेष्टा करते." निला लाडिक स्वरात म्हणाली.

" बरं घेऊन जा हो." आई तिचे म्हणणे मान्य करित म्हणाली.

रात्रीची जेवणे आटोपून निला नुकतीच टीव्ही वरील कार्यक्रम पाहण्यात दंग झाली होती. तेवढयात तुम बीन जाऊं कहॉ या गाण्याची धुन वाजवित तिचा मोबाईल वाजला. तिकडून तिचे पति डॉ.निळकंठ बोलत होते. आठवण आली वाटतं असे म्हणत तिने फोन उचलला. "होय येणार नाही तर काय " तिकडून डॉ.चे प्रतिउत्तर. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर निळकंठ म्हणाला "अगं ती अमेरिकेतील माझी मावस बहिण कल्पना जी आपल्या लग्नात येउ शकली नाही, ती आपल्या भेटी साठी आलेली आहे. तु तेथे असल्या मुळे तुझ्या भेटीसाठी उद्या सकाळी गाडी घेऊन तेथे येईन म्हणते. १० दिवसांनी तिला परत अमेरिकेला परतायचे आहे."

खरेतर निलाने अजून कल्पनास प्रत्यक्षात पाहिलेच नाही व प्रथमच नणंद घरी येणार म्हणुन ती थोडीशी बावरली. तिच्या मनात अनेक विचार सुरू झाले. कशा असतील नणंदबाई? काय बोलतील ? वगैरे वगैरे. अशा एक ना अनेक विचारांनी तिचे मन ग्रासले. या विचारांमध्येच तिच्या स्वागताची तयारी पण सुरू झाली.

सकाळी अकराचे दरम्यान दारात गाडी उभी राहिली. गाडीतून एक मध्यम वयीन सुदृढ बांध्याची, केसांचा बॉबकट केलेला, पाचवारी साडी व त्यास मॅचिंग असे स्लीव्ह लेस ब्लाऊज अशा पहिरावातील तरूणी गाडीतून उतरली.

उतरल्या बरोबर निला जवळ जातच “हाय ! निला कशी आहेस तू ?” असा प्रश्न निलास करित तिला अलिंगन दिले. निलाने पण पूर्वीची ओळख असल्या प्रमाणे तिच्या अभिवादनास प्रतिसाद दिला. नंतर वसंतराव व निलाचे आईचे पायास पदस्पर्श करून आशिर्वाद घेतला.

तिच्या या प्रथम भेटीतील वर्तणुकीने तिने सर्वांचे मन जिंकून घेतले. निलाचे मनातील नणंदेबद्दलची भिती तर पार पळूनच गेली. नंतर तिने स्वतःची ओळख करून देत म्हणाली, “मी सौ.कल्पना, निळकंठची मावस बहिण. भेटीपूर्वी कशी असेल माझी वहिनी? गोरी की काळी, जाड की सडपातळ गवताची काडी की मुरमु-याचे पोते ? ” असे अनेक प्रश्न माझे मनात होते ते आज निलास पाहिल्यावर सर्व सुटले.”

“मग कशी वाटली आमची निला ? ” निलाचे आईने प्रतिप्रश्न केला.

“सुंदरच. माझ्या भावाची निवड आहे.”कल्पना उतरली.

संस्काराप्रमाणे निलाने कल्पनास लवून नमस्कार केला. ओळख परिचयाचा स्वागत सोहळा पार पडल्यावर सगळे चहापानाकडे वळले.

जसजसा वेळ गेला तसतशी ओळख पण वाढत गेली. नणंद भाउजयीचे नात्याचे मैत्रीत रूपांतर झाले. बघता बघता चार दिवस कसे निघून गेले ते दोघींना पण कळले नाही.

पान ३ पहा

कल्पनास अमेरिकेला परत जायचे असल्याने तिने दुसरे दिवशी संध्याकाळी निघण्याचा आपला बेत जाहिर केला व जातांना सोबत निलास घेउन जाण्याचा मनोदय व्यक्त केला. निलाचे आई ने अजून एक दोन दिवस राहण्याचा आग्रह केला. परंतू वेळेचे बंधन असल्याने ती राहू शकली नाही. जातांना आईने दोघींची खणा नारळाने ओटी भरून भाव पूर्ण निरोप दिला. जातांना निला निशीकंदाचे कंद नेण्यास ती विसरली नाही.

निलावर झालेले माहेरचे सुसंस्कार तिची वर्तणूक आचार व विचार तिच्या सासरच्या लोकांना फार आवडले. तिच्या प्रेमळ वर्तणुकीने व दिलेल्या प्रेमाने सासू सासरे व दिर भारावून गेले. ती या नव्या घरी इतकी रममाण झाली की तिच्या वाचून काही घरातले पान हलेनासे झाले. जणू सासर हेच तिचे माहेर झाले.

काही दिवसातच निला व निळकंठला व्यवसायानिमित्त परदेशी जावे लागले. तिचे जाणे अनिवार्य होते. तिची अनुपस्थिती सासू सासरे व घरातील नोकर माणसांना देखिल जाणवू लागली.

आता दारी लावलेला निशीकंद चांगलाच बहरास आला होता. त्याच्या सुवासाने संपूर्ण वाडा सुगंधित झाला होता. याचवेळी परदेशातून फोन आला. सासु बाईंनी फोन उचलला. फोनवर निला बोलत होती. ख्याली खुशालीच्या गप्पा झाल्यावर त्यांचे तोंडून सहजच उदगार निघाले. “तुझ्या अनुपस्थितीत पण तुझ्या माहेरचा निशीकंद फार छान फुललाय अन् कसा सुगंध देतोय बघ.”